# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**राज्यशास्त्र विभाग**



# राजगुरू महाविद्यालयाची 'गावभेट'

## राज्यशास्त्र विभागाची वाकळवाडी येथे अभ्यास सहल

। राजगुरुनगर ✍ प्रतिनिधी।

**हुतात्मा** राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने वाकळवाडी येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये राज्यशास्त्राचा विशेष स्तरावर अभ्यास करणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रामविकासात उच्चशिक्षित युवकांचा सहभाग वाढवणे व ग्रामविकासाची प्रक्रिया समजून घेणे हा या भेटीमागील उद्देश होता.

विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, व्यायामशाळा, सार्वजनिक वाचनालय, विविध कार्यकारी सोसायटी आदी संस्थांना भेटी देऊन कामकाज समजावून घेतले. ग्रामपंचायत सरपंच व महाविद्यालयीन विद्यार्थी सोनाली नायकवडी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपसरपंच पांडुरंग पवळे, दीपक नायकवडी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभाकर जगताप याप्रसंगी उपस्थित होते.

### ग्रामपंचायतीच्या कारभार घेतला जाणून

» **ग्रामसेविका** संगीता जाधव यांनी ग्रामपंचायतीची कार्य, विकास निधी, उत्पन्न मार्ग या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. ग्रामपंचायतीत काम करताना येणाऱ्या अडचणी, गटातटाचे राजकारण, गावच्या निर्णयप्रक्रियेतील महिलांचे स्थान, राजकारणाकडे करियर म्हणून पाहणाऱ्या स्त्रियांना शक्य आहे का, आदी प्रश्नांना सोनाली नायकवडी यांनी उत्तरे दिली.




### स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढणे गरजेचे

» **आज** महिलांनी स्वत:ला वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढायला हवा. त्यांना आपल्या आसपासच्या परिस्थितीकडे, प्रश्नांकडे बघण्याची वेगळी दृष्टी असते. त्याचा उपयोग त्यांनी करायला हवा, असे सोनाली नायकवडी यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांनी सक्षमपणे काम केले असून राजकारणात उच्चशिक्षित महिला येत आहेत, हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे, असे डॉ. कैलास सोनवणे यांनी यावेळी सांगितले. महिलांना संसदीय राजकारणातही आरक्षणाची गरज आहे. त्यासाठी महिलांनी राजकारणाकडे पुरुषप्रधान पध्दतीने न पाहता आपले मार्ग स्वत: शोधायला हवेत, असे आवाहन त्यांनी केले. या अभ्यास सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे व डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले.

जनप्रवास ५
शनिवार, दि. १७ मार्च २०१८

# राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतले ग्रामविकासाचे धडे

राजगुरुनगर । वार्ताहर

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने वाकळवाडी (ता.खेड ) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये राज्यशास्त्राच्या विशेष स्तरावर अभ्यास करणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रामविकासात उच्चशिक्षित युवकांचा सहभाग वाढवणे व ग्रामविकासाची प्रक्रिया समजून घेणे हा या भेटीमागील उद्देश होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, व्यायामशाळा, सार्वजनिक वाचनालय, विविध कार्यकारी सोसायटी आदि संस्थांना भेटी देऊन कामकाज समजावून घेतले. ग्रामपंचायत सरपंच व



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाकळवाडी (ता.खेड ) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली नायकवडी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी उपसरपंच पांडुरंग पवळे, सदस्य दीपक नायकवडी, डॉ.कैलास सोनवणे, डॉ.प्रभाकर जगताप आदी उपस्थित होते.

ग्रामसेविका संगीता जाधव यांनी ग्रामपंचायतीची कार्य, विकास निधी, उत्पन्न मार्ग या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. ग्रामपंचायतीत काम करताना येणाऱ्या अडचणी, गटातटाचे राजकारण, गावच्या निर्णयप्रक्रियेतील महिलांचे स्थान, राजकारणाकडे करियर म्हणून पाहणे स्त्रियांना शक्य आहे का आदि प्रश्नांना सरपंच सोनाली नायकवडी यांनी उत्तरे दिली. या वेळी बोलताना त्या म्हणाल्या की, आज महिलांनी स्वतःला वेगवेगळ्या क्षेत्रात सिध्द केले असल्याने त्यांचा राजकीय सहभाग वाढायला हवा. स्त्रियांना आपल्या आसपासच्या परिस्थितीकडे, प्रश्नांकडे बघण्याची स्वतःची वेगळी दृष्टी असते. त्याचा उपयोग त्यांनी करायला हवा. सरपंच झाल्यानंतर मी निवडणुकीचे राजकारण बाजूला ठेऊन सर्वांना बरोबर घेऊन ग्रामविकासाची भूमिका घेतली. आतापर्यंत गावात तीन कोटींची विकासकामे केली असून गावातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. कैलास सोनवणे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांनी सक्षमपणे काम केले असून राजकारणात उच्चशिक्षित महिला येत आहेत हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे. आता महिलांना संसदीय राजकारणातही आरक्षणाची गरज आहे.

त्यासाठी महिलांनी राजकारणाकडे पुरुषप्रधान पध्दतीने न पाहता आपले मार्ग स्वतः शोधायला हवेत असे आवाहन त्यांनी केले. या अभ्यास सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे व डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले.

सकाळ
पुणे, शनिवार
१७ मार्च २०१८
४

# राजगुरू महाविद्यालयाचा वाकळवाडीत अभ्यासदौरा

राजगुरुनगर, ता. १६ : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व अभ्यास मंडळातर्फे वाकळवाडी (ता. खेड) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये राज्यशास्त्राच्या विशेष स्तरावर अभ्यास करणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी वाकळवाडी ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, व्यायामशाळा, सार्वजनिक वाचनालय, विविध कार्यकारी सोसायटी येथे भेटी देऊन कामकाज समजून घेतले. सरपंच व महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली नायकवडी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी उपसरपंच पांडुरंग पवळे, ग्रामपंचायत सदस्य दीपक नायकवडी आदी उपस्थित होते. ग्रामसेविका संगीता जाधव यांनी ग्रामपंचायतीचे कार्य, विकास निधी, उत्पन्न मार्ग याविषयी माहिती दिली.

काम करताना येणाऱ्या अडचणी, गटातटाचे राजकारण, निर्णयप्रक्रियेतील महिलांचे स्थान, राजकारणातील करियर इत्यादी विषयांवरील प्रश्नांना सरपंच सोनाली नायकवडी यांनी उत्तरे दिली.

नायकवडी म्हणाल्या, "स्त्रियांना आपल्या आसपासच्या परिस्थितीकडे, प्रश्नांकडे बघण्याची स्वतःची वेगळी दृष्टी असते. त्याचा उपयोग त्यांनी राजकीय कामात करायला हवा.'' या अभ्यास सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले.

७ पुढारी | पुणे, शनिवार १७ मार्च २०१८



गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीत सहभागी झालेले विद्यार्थी.

## 'राजगुरू'च्या विद्यार्थ्यांना ग्रामविकासाचे धडे

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने वाकळवाडी (ता. खेड) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहल गेली होती. ग्रामविकासात उच्चशिक्षित युवकांचा सहभाग वाढविणे व ग्रामविकासाची प्रक्रिया समजून घेणे हा या भेटीमागील उद्देश होता. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, व्यायामशाळा, सार्वजनिक वाचनालय, विविध कार्यकारी सोसायटी आदी संस्थांना भेटी देऊन कामकाज समजावून घेतले. सरपंच सोनाली नायकवाडी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपसरपंच पांडुरंग पवळे, सदस्य दीपक नायकवाडी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभाकर जगताप उपस्थित होते. ग्रामसेविका संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे व डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले.

केसरी पुणे, १८ मार्च २०१८ ३

## राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतले ग्रामविकासाचे धडे



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाकळवाडी (ता.खेड) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले.

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने वाकळवाडी (ता.खेड ) येथे एकदिवसीय गावभेट शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये राज्यशास्त्राचा विशेष स्तरावर अभ्यास करणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रामविकासात उच्चशिक्षित युवकांचा सहभाग वाढवणे व ग्रामविकासाची प्रक्रिया समजून घेणे हा या भेटीमागील उद्देश होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, व्यायामशाळा, सार्वजनिक वाचनालय, विविध कार्यकारी सोसायटी आदि संस्थांना भेटी देऊन कामकाज समजावून घेतले. ग्रामपंचायत सरपंच व महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली नायकवडी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी उपसरपंच पांडुरंग पवळे, सदस्य दीपक नायकवडी, डॉ.कैलास सोनवणे, डॉ.प्रभाकर जगताप आदी उपस्थित होते.

ग्रामसेविका संगीता जाधव यांनी ग्रामपंचायतीची कार्य, विकास निधी, उत्पन्न मार्ग या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

ग्रामपंचायतीत काम करताना येणाऱ्या अडचणी, गटातटाचे राजकारण, गावच्या निर्णयप्रक्रियेतील महिलांचे स्थान, राजकारणाकडे करियर म्हणून पाहणे स्त्रियांना शक्य आहे का आदि प्रश्नांना सरपंच सोनाली नायकवडी यांनी उत्तरे दिली. या अभ्यास सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे व डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख